# महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

वैद्यकीय शिक्षण व संशोधन,शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत,चौथा मजला,सेंट जॉर्जेस रूग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.वेबसाईट: www.msbnpe.org ई-मेल- msbnpe@gmail.com ,मो. नं: ०२२ २२६११०१५

**MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION**

Directorate of Medical Education and Research, ४th Floor, St.Georges Hospital Campus, P.D'Melo Road, Fort, Mumbai-४०० ००१ Website:www.msbnpe.org E-mail- msbnpe@gmail.com, Mobile No- ०२२ २२६११०१५

क्र.मराशुवपशिमं/विदयार्थी नोंदणी/५९१८ /२०२२ दिनांक-२२/११/२०२२

प्रति,
प्राचार्य / संस्था प्रमुख,
सर्व मान्यता प्राप्त व संलग्नीत संस्था.

**विषय : जी.एन.एम. नर्सिंग अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता प्रवेशित केलेल्या विदयार्थ्यांची पुन:श्च नोंदणी करण्याबाबत.**

**संदर्भ :** १. एफ.क्र. १- ६/(एल.टी.)-२०२२-आय.एन.सी. दिनांक : ०२ ऑगस्ट, २०२२.
२. क्र. मराशुवपशिमं/४८४४/२०२२, दि. १६/०९/२०२२.
३. क्र. मराशुवपशिमं/विदयार्थी नोंदणी/५५०८/२०२२, दि. १३/१०/२०२२.
४. एफ.क्र. १- ६/(एल.टी.)-२०२२-आय.एन.सी. दिनांक : २७ ऑक्टोबर, २०२२.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सर्व संलग्नीत संस्था / प्राचार्य / संस्थाप्रमुख यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ नर्सिंग अभ्यासक्रमाच्या विदयार्थी प्रवेशित करण्याकरीता संदर्भ क्र. २ व ३ नूसार मंडळाच्या संकेतस्थळावर परिपत्रक प्रसिध्द करण्यात आले होते.

सर्व संस्थाप्रमुखांनी / प्राचार्यांनी भारतीय परिचर्या परिषद नवी दिल्ली आणि मंडळाच्या मानांकानूसार आवश्यक शैक्षणिक पात्रतेनूसार जी.एन.एम. नर्सिंग अभ्यासक्रमाचे विदयार्थी प्रवेशित करणे आवश्यक आहे. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये प्रवेशित केलेल्या विदयार्थ्यांच्या नोंदणीकरीता मंडळाच्या संकेतस्थळाच्या पोर्टलवर दि. ३१/१०/२०२२ पर्यंत रात्री १२:०० वाजेपर्यंत नोंदणी सुरु ठेवण्यात आलेली होती. सदंर्भ क्र. ४ नूसार भारतीय परिचर्या परिषदे कडून जी.एन.एम अभ्यासक्रमाकरीता दि. ३०/११/२०२२ पर्यंत विदयार्थी प्रवेशित करण्याकरीता पत्र प्राप्त झाले आहे. त्या अनुशंगाने **सर्व संस्थाप्रमुखांनी व प्राचार्यांनी जी.एन.एम. नर्सिंग अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता प्रवेशित केलेल्या सर्व विदयार्थ्यांची पुन:श्च नोंदणी करावी.** व नोंदणी केल्यानंतर प्रवेशित झालेल्या विदयार्थ्यांची अंतिम यादी दि. ३०/११/२०२२ रोजी रात्री १२:०० वाजेपर्यंत मंडळाच्या ई-मेल enrollment३msbnpe२०२१@gmail.com वर पाठविण्यात यावी. संकेतस्थळाच्या पोर्टलवर विदयार्थी नोंदणी नाही झाल्यास किंवा विदयार्थी नोंदणी यादी मंडळाच्या ई-मेल वर प्राप्त न झाल्यास विदयार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसान व कायदेशीर बाबी करीता संस्था सर्वस्वी जबाबदार राहील, याची नोंद घ्यावी.

**टिप :** भारतीय परिचर्या परिषद यांच्या परिपत्रकांमध्ये काही बदल झाल्यास त्याप्रमाणे परिपत्रक मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

प्रबंधक
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ